PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Nishani Dava Angatha
Year: 2009

Song: Ekkad Baja Tikkad Baja
Lyricist:

अ आ इ ई
उ ऊ ए ऐ
ओ औ अं अः

इक्कड बाजा तिक्कड बाजा
सगळा नुसता गाजा वाजा
अ अ अननस
आ आ आई
इक्कड बाजा तिक्कड बाजा
सगळा नुसता गाजा वाजा
वरतून खाली खालून खाली
घसरत घसरत आज्ञा आली
वरतून खाली खालून खाली
घसरत घसरत आज्ञा आली
यांचे बोट त्यांचे बोट

सांगते शिकवा अडाणी
क ला काना का
ख ला काना खा
ग ला काना गा
घ ला काना घा
इक्कड बाजा तिक्कड बाजा
सगळा नुसता गाजा वाजा

क ला काना का
ख ला काना खा
ग ला काना गा
घ ला काना घा
क क कमळातला

आला आला आला आला
साहेब साला साहेब साला
हाजी हाजी झुकवा माना
सलाम ठोका थुंकी झेला
मास्तर करून राहिले गर्दी
सगळी नुसती खोगीर भर्ती
त्यांच्या नावे होती पाटी
शाई त्यांच्या अंगठ्यावरती
केंद्रो केंद्री पडती धाडी
सगळी गाढवे बनली घोडी
केंद्रो केंद्री पडती धाडी
सगळी गाढवे बनली घोडी
साक्षरतेची धो धो गंगा
निरक्षरांची तरते होडी
बबन नमन कर
बबन नमन कर
छगन भजन कर
छगन भजन कर
इक्कड बाजा तिक्कड बाजा
सगळा नुसता गाजा वाजा
इक्कड बाजा तिक्कड बाजा
सगळा नुसता गाजा वाजा
अलीफ् अलीफ्
बे बे
पे पे
ते ते
हे
से
जिम

PlanetRead

Literacy for a Billion

जे
सजली सोंगे सजली ढोंगे
पाट्यांवरती पाढे कोष्टक
सुजाण सारे अजाण होऊन
सुजाणतेचे करती नाटक
जुनी टाकूनी अवघी ओळख
नवीन नावे नवीन गावे
खोटी नावे खरे तोतये
खोट्यासाठी खरे लिहावे
अशी साधना अशी तपस्या
सरस्वती ही गदगदली
अशी साधना अशी तपस्या
सरस्वती ही गदगदली
अभियानाची खरूज अवघ्या
कुवेकांनी खाजवली
इक्कड बाजा तिक्कड बाजा
सगळा नुसता गाजा वाजा
इक्कड बाजा तिक्कड बाजा
सगळा नुसता गाजा वाजा

बे एके बे
बे दुणे चार
बे त्रिक सहा
बे चोक
बे चोक
बे चोक

नको कारणे नाकाराणे
आज्ञा होता काम निघो
मतलब केवळ आदेशांशी
सत्य साले मुळात झूठ
आदेशांचे गुलाम हसले
घुमे पिपाणी विजयाची
आदेशांचे गुलाम हसले
घुमे पिपाणी विजयाची
साक्षरतेवर कुठे निशाणी
एका डाव्या अंगठ्याची
इक्कड बाजा तिक्कड बाजा
सगळा नुसता गाजा वाजा

त ला काना ता
थ ला काना था
द ला काना दा
ध ला काना धा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*